ठाणे शहर


**महाराष्ट्र शासन**

पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर

खारकर आळी, कळवा ब्रीज जवळ,ठाणे पश्चिम-४००६०१

(आस्थापना शाखा) ई-मेल - cp.thane.sheetbr@mahapolice.gov.in


---

जा.क्र.ठाआ/आस्था-२(२)/जेष्ठता यादी/ २४ /२०२४ ठाणे शहर दिनांक:०३/०१/२०२४

---

**महत्त्वाचे / कालमर्यादा**

संदर्भ : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१/०६/२०२१ अधिसुचना

विषय : पोलीस आयुक्त, ठाणे शहर आयुक्तालयाचे आस्थापनेवरील पोलीस अंमलदारांची सामायीक जेष्ठतासुची प्रसिध्द करणेबाबत..

****

**आदेश**

पोलीस आयुक्त, ठाणे शहर आस्थापेवरील पोलीस अंमलदार व चालक पोलीस अंमलदार संवर्गातील सहा.पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांची दि.०१/०१/२०२४ ची तात्पुरती (PROVISIONAL) जेष्ठतासुची यासोबत प्रसिध्द करण्यात येत असून ती ठाणे पोलीस आयुक्तालयाचे www.thanepolice .gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तरी सर्व प्रभारी अधिकारी यांनी सदरची तात्पुरती जेष्ठतासुची सर्व संबधीत पोलीस अंमलदारांच्या निदर्शनास आणून द्यावी. जेष्ठतासुचीमध्ये त्यांच्या नांवासमोर असलेल्या रकान्यातील सर्व माहिती (नांव, बक्कल नंबर, जन्म दिनांक, भरती दिनांक, पदोन्नती दिनांक, जात प्रवर्ग इत्यादी) पडताळून पाहून सदर जेष्ठतासुचीमध्ये काही दुरुस्ती असल्यास आवश्यक त्या पुराव्यासह त्यांची अभिवेदने संबधीत पोलीस उप आयुक्त कार्यालयाचे मार्फतीने दि.३१/०१/२०२४ पर्यंत या कार्यालयास पाठवावी. पोलीस उप आयुक्त कार्यालयाने पोलीस अंमलदाराचे सेवाजेष्ठता यादीतील दुरुस्तीसाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची त्यांचे सेवापटावरुन पडताळणी करुन दुरुस्तीबाबत स्पष्ट अभिप्रायासह सदरचे अर्ज त्वरेने या कार्यालयास पाठवावे.

तसेच प्रभारी अधिकारी यांनी तात्पुरत्या (PROVISIONAL) जेष्ठता यादीचे अवलोकन करुन खालीलप्रमाणे कार्यवाही करुन माहिती सादर करावी.

१. मागासप्रवर्गात मोडणाऱ्या सर्व अंमलदारांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर करणेबाबत यापूर्वी वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तरीही अद्याप ज्या मागासवर्गीय पोलीस अंमलदारांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत, त्यांना तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची लेखी समज देण्यात यावी.

२. इतरमागास प्रवर्गातील उमेदवार आरक्षणाचा फायदा घेवून सेवेत दाखल झाले असतील तर अशा सर्व अंमलदारांना जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती या कार्यालयात सादर कराव्यात. जर त्यांची नियुक्ती खुल्या प्रवर्गातून झाली असेल, आणि त्यांनी इतर मागास प्रवर्गातील आरक्षणाचे कोणतेही लाभ घेतले नसतील अशा अंमलदारांना खुल्या प्रवर्गात दर्शविण्यातकरिता त्यांची देखील माहिती सादर करावी.

३. ज्या अंमलदारांना निलंबित केले असेल, किंवा ते शिक्षा भोगत असतील अशा अंमलदारांची माहिती सादर करावी.

४. ज्या पोलीस अंमलदारानी यापूर्वी नियमित पदोन्नती नाकारली आहे. त्याचीही माहिती पाठवावी.

वरीलप्रमाणे सर्व माहिती दि.३१/०१/२०२४ पर्यंत या कार्यालयास सादर करावी. त्यानंतर अंतिम सेवाजेष्ठता यादी नियमित करण्यात येईल व त्यानंतर कोणतेही आक्षेप / बदलाचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**(रुपाली अंबुरे)**
**पोलीस उप आयुक्त,मुख्या.१**
**पोलीस आयुक्त कार्यालय,ठाणे शहर**

प्रति,

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ ते ५
पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा / विशेष शाखा / शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर
सहा.पोलीस आयुक्त, मोटार परिवहन विभाग, ठाणे शहर
सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, ठाणे शहर / राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, ठाणे शहर
सर्व नियंत्रण कक्ष प्रभारी अधिकारी, ठाणे शहर / सर्व अतिक्रमण विभाग प्रभारी अधिकारी, ठाणे शहर

प्रत

९ ए.एस. (पोलीस पत्रक प्रसिध्दीसाठी)